नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २४१ Issue - 241 | वार मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ Blow- Tuesday Date 20 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com


# २२ जानेवारीला महापौर पदासाठी आरक्षणाची सोडत

## राज्यातील २९ महापालिकांत आरक्षणानुसार होणार निवड; उत्सुकता शिगेला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापालिकांच्या निवडणुका झालेल्या आहेत. मात्र, सर्वांचं लक्ष आता महापौर आरक्षण सोडतीकडे लागले असून आरक्षण सोडतीत नेमकं काय होणार, कुठल्या प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर होणार याचीच उत्सुकता आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदासाठी २२ जानेवारीला आरक्षणाची सोडत निघणार आहे. त्यामुळे कोणत्या महानगरपालिकेत कोणत्या आरक्षणातुन कोणता महापौर बसणार याकडे सर्वांच लक्ष असणार आहे. या आरक्षण सोडतीची प्रक्रीया नेमकी काय, कशी असणार आहे, याची माहिती या लेखातून मिळेल.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल लागले असून जवळपास २४ महापालिकेत भाजप महायुतीने वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे, राज्यातील बहुतांश महापालिकेत भाजप महायुतीचाच महापौर होणार आहे. मात्र, मुंबई महापालिकेत महापौर कोणत्या पक्षाचा आणि कोण होणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. आता, २२ जानेवारी रोजी होणाऱ्या आरक्षण सोडतीतूनच विजयी नगरसेवकांपैकी कोण महापौर होणार हे समजणार आहे. कारण, ज्या प्रवर्गासाठी हे आरक्षण जाहीर होईल, त्याच प्रवर्गातील व्यक्तीला महापौरपदाची लॉटरी लागणार आहे. मुंबईत एसटी प्रवर्गासाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यास मोठी उलथापालथ मुंबईत पाहायला मिळेल. कारण, येथील एसटी प्रवर्गातील दोन्ही जागेवर ठाकरेंचेच उमेदवार विजयी झाले आहेत. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडे एसटी प्रवर्गाचे विजयी उमेदवार नाहीत. त्यामुळे, आरक्षण सोडत अत्यंत महत्वाची बनली आहे. मात्र, ही आरक्षण सोडत नेमकं कशी होणार हेच जाणून घेता येईल.



अशी असेल 'महापौर'पदाची आरक्षण सोडत

महापौर पदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने निघणार आहे.

साधारणत: मागील २० वर्षांचं आरक्षण लक्षात घेतलं जाणार आहे.

जे आरक्षण याआधी त्या महापालिकेत होतं, ते वगळता इतर आरक्षणाची चिठ्ठी असणार आहे. एससी, एसटी, ओबीसी आणि खुला वर्ग, त्यामध्ये पन्नास टक्के महिला आरक्षण असे आरक्षणाचे प्रवर्ग असणार आहेत. त्या महापालिकेमध्ये याआधी कोणतं आरक्षण झालेलं आहे, ती चिठ्ठी बाजूला करुन उर्वरित आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकल्या जाणार आहेत.

या चिठ्ठ्या बॉक्समध्ये टाकताना सर्वांना दाखवल्या जातील, त्यानंतर पारदर्शक असणाऱ्या बॉक्समध्ये त्या टाकल्या जातील.

त्या सर्व चिठ्ठ्या एकत्र झाल्यानंतर त्यातून एक-एक चिठ्ठी बाहेर काढून आरक्षण सोडत जाहीर केली जाणार आहे.

त्यानंतर पुन्हा ५० टक्के महिला आरक्षणाच्या चिठ्ठ्या टाकून महिला आरक्षण काढलं जाणार आहे.

या पद्धतीने राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदाचे आरक्षण २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहामध्ये होणार आहे.

मुंबई महापालिकेचा अंतिम निकाल :- भाजप - ८९, शिवसेना ठाकरे गट - ६५, शिवसेना - २९, काँग्रेस - २४, मनसे - ६, एमआयएम-८, एनसीपी - ३, एसपी - २, एनसीपी शप - १, एकूण- २२७

# नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे : महाराष्ट्राची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याकरिता राज्य सरकारने सुरु केलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे अशी विनंती राज्याच्या वतीने केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्याकडे करण्यात आली.

राज्यातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्ली येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर पाटील यांच्या उपस्थितीत विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री गिरीष महाजन, जलशक्ती विभागाचे केंद्रीय सचिव कांताराव, आयुक्त प्रविण कुमार, विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर, सचिव डॉ.संजय बेलसरे यांच्यासह राज्याच्या सर्व पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यामध्ये सुरु असलेल्या सिंचन प्रकल्पांच्या कामाची माहिती केंद्रीय मंत्र्यांना देण्यात आली. सुरु असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधानही व्यक्त केले. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत राज्यातील २९ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून, यामध्ये कोकण पाटबंधारे विकास महामंडळअंतर्गत ५, विदर्भ पाटबंधारे महामंडळा अंतर्गत ७, कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत ९ आणि गोदावरी विकास महामंडळ अंतर्गत ४ तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत ४ प्रकल्पांची कामे सुरु असल्याचे केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यापैकी कृष्णा व गोदावरी प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेल्या १३ प्रकल्पांपैकी दहा प्रकल्प पूर्ण झाले असल्याची माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बैठकीत दिली.

बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत कृष्णा व गोदावरी महामंडळाच्या अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांच्या कामापैकी १५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित दोन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता विभागाचे प्रयत्न असून, या दोन्हीही योजनांच्या अंतर्गत सुरु असलेल्या कामांची गती वाढवून ही कामे पूर्णत्वास जाण्यासाठी सहकार्य करण्याची ग्वाही केंद्रीय मंत्री सी.आर पाटील यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात नदीजोड प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्राधान्याने दमणगंगा-एकदरे-गोदावरी, (पान २ वर...)

# मौनी अमावस्येनिमित्त भारतीय रेल्वेने २४४ विशेष रेल्वेगाड्या चालवल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय रेल्वेने मौनी अमावस्येच्या काळात रेल्वे वाहतुकीचे यशस्वीपणे व्यवस्थापन केले असून ३ जानेवारी २०२६ पासून देशभरात २४४ विशेष रेल्वेगाड्या चालवून भाविकांसाठी सुरळीत आणि सोयीस्कर प्रवासाची खात्री केली. उत्तर रेल्वेवर ३१, उत्तर मध्य रेल्वेवर १५८ आणि पूर्वोत्तर रेल्वेवर चालवलेल्या ५५ अशा विशेष रेल्वेगाड्यांमधून सुमारे ४.५ लाख प्रवाशांनी प्रवास केला. सणासुदीच्या काळात त्रासमुक्त प्रवास आणि सुरक्षित प्रवासाची सोय व्हावी यासाठी या विशेष सेवांचे काळजीपूर्वक नियोजन आणि व्यवस्थापन करण्यात आले होते.

१८ जानेवारी रोजी प्रयागराजमध्ये सणासुदीच्या प्रवासाचा उच्चांक दिसून आला, ज्यात उत्तर रेल्वेवर ११, उत्तर मध्य रेल्वेवर २२ तर पूर्वोत्तर रेल्वेवर ७ गाड्यांसह एकूण ४० विशेष गाड्या चालवण्यात आल्या, ज्यातून अंदाजे १ लाख प्रवाशांनी प्रवास केला. विशेष म्हणजे यावेळी सर्व नियमित गाड्या नियोजित वेळेनुसार धावल्या, जे भारतीय रेल्वेच्या प्रभावी नियोजन आणि कार्यक्षमतेचे द्योतक आहे.

या विशेष गाड्यांचे यशस्वी परिचालन हे सणासुदीच्या गर्दीच्या काळात प्रवाशांना सुरक्षित, सोयीस्कर आणि अखंड सेवा प्रदान करण्याच्या भारतीय रेल्वेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. मोठ्या प्रमाणावरील प्रवासी वाहतूक कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यासाठी भारतीय रेल्वे ही तंत्रज्ञान, संसाधन नियोजन आणि विविध विभागांमधील समन्वयाचा वापर करत आहे.

# राष्ट्रीय महामार्गापासून ५०० मीटर अंतरातील दारूची दुकाने हटवण्याच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाच्या राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांपासून ५०० मीटर अंतरातील सर्व दारूची दुकाने हटविण्याच्या राज्य सरकारला दिलेल्या आदेशाला स्थगिती दिली. रस्ते अपघातांमध्ये वाढ लक्षात घेता उच्च न्यायालयाने हा आदेश दिला होता. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने दारू विक्रेते आणि राजस्थान सरकारने दाखल केलेल्या याचिकांवर नोटीस बजावली. तथापि, खंडपीठाने असेही म्हटले आहे की उच्च न्यायालयाच्या चिंता वैध आहेत आणि सरकार भविष्यातील उत्पादन शुल्क धोरण तयार करताना त्यांचा विचार करू शकते. राज्य सरकारचे प्रतिनिधित्व करणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी असे निर्देश दिले होते की महामार्गांपासून ५०० मीटर अंतरात दारूची दुकाने नसावीत, परंतु हे रस्ते शहरांमधून जातात तिथे समस्या निर्माण झाल्या. ते पुढे म्हणाले, नंतर आदेशात स्पष्ट करण्यात आले की महानगरपालिका (नगर पालिका/महानगरपालिका) च्या हद्दीतील दारू दुकानांवर असे कोणतेही निर्बंध असणार नाहीत.

महानगरपालिका हद्दीत कोणतेही निर्बंध नाहीत

दारू दुकान मालकांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी असा युक्तिवाद केला की उच्च न्यायालयाने पक्षकारांचे म्हणणे न ऐकता आदेश देऊन चूक केली. त्यांनी सांगितले की उच्च न्यायालय सुजानगड गावाशी संबंधित एका प्रकरणाची सुनावणी करत होते, परंतु इतर पक्षकारांचे म्हणणे न ऐकता संपूर्ण राज्यासाठी आदेश जारी केला. यावर उत्तर देताना न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी सांगितले की उच्च न्यायालयाचे संपूर्ण राज्यावर अधिकार क्षेत्र आहे. रोहतगी यांनी आपला युक्तिवाद पुढे चालू ठेवत म्हटले की उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या विरुद्ध आहे, ज्यामध्ये असे म्हटले होते की महानगरपालिका हद्दीत असे कोणतेही निर्बंध नाहीत.

डिसेंबर महिन्यात उच्च न्यायालयाने महामार्गालगत असलेल्या दारूच्या दुकानांच्या स्थानाशी संबंधित एका याचिकेवर सुनावणी केली. या याचिकेत २०२५ मध्ये राजस्थानमध्ये दारू पिऊन वाहन चालवण्याच्या घटनांमध्ये झालेल्या मोठ्या घटनांवर प्रकाश टाकण्यात आला होता. दारूच्या नशेत महामार्गांवर वाढणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत, उच्च न्यायालयाने राज्याला निर्देश दिले की, राष्ट्रीय किंवा राज्य महामार्गापासून ५०० मीटरच्या प्रतिबंधित मर्यादेत येणारी सर्व दारूची दुकाने, ती कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किंवा वैधानिक विकास प्राधिकरणांच्या अंतर्गत येत असली तरीही, दोन महिन्यांच्या आत हटवावीत किंवा त्यांचे स्थलांतर करावे. या आदेशाला आव्हान देत याचिका दाखल करण्यात आली होती.

राज्याच्या सर्व भागासाठीवैविध्यपूर्ण क्षेत्रात गुंतवणूक येणार

दावोसमध्ये महाराष्ट्र पॅव्हेलियन सज्ज; उद्योग,गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र

# विदेशी गुंतवणूकीसाठी 'महाराष्ट्र' भारताचा गेट वे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इ्युरिक : 'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक ईकोसिस्टिम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 'महाराष्ट्र' हे भारतात येणाऱ्या गुंतवणुकीसाठी गेटवे ऑफ इंडिया आहे. त्यामुळे भारतातील अन्य राज्यांशी आमची चांगल्या अर्थाने स्पर्धा आहे. सरतेशेवटी देशासाठी ही बाब चांगलीच ठरते. पण यातही महाराष्ट्र पुढे आहे याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत प्रतिनिधीमंडळासमवेत दावोस येथे दाखल झाले आहेत. या दरम्यान त्यांनी महाराष्ट्र पॅव्हेलीयन मध्ये माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे . त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम गुंतवणूकदारांसाठी चावडी

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची वार्षिक बैठक ही उद्योग, गुंतवणूकदारासाठी एक प्रकारे चावडी आहे. याठिकाणी दरवर्षी आम्ही महाराष्ट्राकडे काय आहे, कोणती क्षमता आहे, हे शोकेस करण्यासाठी येत असतो. यंदाही गतवर्षीच्या तुलनेत आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल असा




विश्वास आहे. कारण देशात अशा प्रकारे येणारी गुंतवणूक व त्याबाबतचे करार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अशाप्रकारे सुमारे ६० ते ६५ करार प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्राला यश मिळाले आहे. दावोस परिसर निसर्गसौंदर्याने नटलेला आहेच. इथे उद्योगजगत एकत्र येतो. महाराष्ट्रातून आलेल्या उद्योजकांनी या मंचाचा पुरेपूर उपयोग करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनणार

दरम्यान, सकाळ मीडिया ग्रुपच्या ग्लोबल इॅम्पॅक्ट फोरमवर मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रकट मुलाखत झाली. त्यावेळी ते म्हणाले, गेल्या दशकात महाराष्ट्राने सरासरी १० टक्क्यांहून अधिक विकासदर कायम राखला असून, राज्य २०३२ पर्यंत देशातील पहिले ट्रिलियन डॉलर्सची असणारी अर्थव्यवस्था बनू शकते. मात्र, हा टप्पा आणखी वेगाने २०३० पर्यंत गाठण्याचे उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सध्याची जागतिक भू-राजकीय परिस्थिती आव्हानात्मक असली, तरी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अंदाजानुसार भारत हा जागतिक अर्थव्यवस्थेतील 'ब्राइट स्पॉट' आहे. जगभरातील विकासदर मंदावले असताना, महाराष्ट्र मात्र आपला विकासदर टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरत आहे आणि राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत आहे.

'एमएसएमई हे अर्थव्यवस्थेचा कणा'

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) हे अर्थव्यवस्थेचा कणा असून रोजगारनिर्मितीत त्यांचा सर्वाधिक वाटा आहे. केंद्र व राज्य सरकार 'एमएसएमई'ना प्रोत्साहन देत आहे. केवळ भांडवल नव्हे, तर आजच्या काळात विश्वासार्हता हा सर्वात मोठा घटक आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्राने दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता केली असून, राज्याचा ट्रॅक रेकॉर्ड आश्वासक असल्याचे त्यांनी सांगितले.

१६ लाख कोटींचे सामंजस्य करार, रूपांतरण दर ७५-८० टक्के

गेल्या वर्षी महाराष्ट्रात तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. यात प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतरित व्हावेत यासाठी राज्याने स्वतंत्र ट्रॅकिंग यंत्रणा उभारली आहे. देशपातळीवर जिथे सामंजस्य करारांचे रूपांतरण प्रमाण साधारणतः २५ ते ३० टक्के असते, तिथे महाराष्ट्रात हे प्रमाण ५० ते ५५ टक्के असून, दावोस करारांच्या बाबतीत ७५ ते ८० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. जमीन वाटप, मंजुरी प्रक्रिया, तसेच 'वॉर रूम'च्या माध्यमातून प्रत्येक गुंतवणूकदाराला उद्योग क्षेत्राशी जोडून ठेवण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस (पान २ वर...)

## देशातील ३९ टक्के थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात

**गेल्या वर्षी भारतात आलेल्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी ३९ टक्के 'एफडीआय' महाराष्ट्रात आला आहे. त्यामुळे गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य शासनाने आतापर्यंत १५ ते १६ धोरणे लागू केली असून, या धोरणांमुळे गुंतवणूकदारांसाठी सक्षम आणि विश्वासार्ह इकोसिस्टीम तयार झाली आहे. आज महाराष्ट्रात गुंतवणुकीची कमतरता नाही आणि यासाठी योग्य ते वातावरण महाराष्ट्रात तयार झाले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### राज्यात मोठी गुंतवणूक

'महाराष्ट्र विश्वासार्ह आहे. आम्ही जे सांगतो. ते करतो. त्यामुळेच जगभरातील उद्योजक, गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास वाढला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारत वाटचालीसाठी पार्श्वभूमी निर्माण केली आहे. एक ईकोसिस्टिम तयार केली आहे. त्याआधारे यंदाही महाराष्ट्रात प्रचंड प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. 'महाराष्ट्र' हे भारतात येणाऱ्या गुंतवणुकीसाठी गेटवे ऑफ इंडिया आहे. त्यामुळे भारतातील अन्य राज्यांशी आमची चांगल्या अर्थाने स्पर्धा आहे. सरतेशेवटी देशासाठी ही बाब चांगलीच ठरते. पण यातही महाराष्ट्र पुढे आहे याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी गुंतवणूक मिळवणार असून. त्यासाठी वैविध्यपूर्ण अशा दहा ते बारा क्षेत्रातील उद्योगांशी समन्वय साधला जात आहे. आता तिसरी मुंबई उभी राहते आहे. तिच्यासाठी मोठी गुंतवणूक मिळण्याचे संकेत आहेत. आमच्याकडे उत्तम मेन्यू कार्ड आहे . त्यामुळे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात यशस्वी होऊ, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमची वार्षिक बैठक ही उद्योग, गुंतवणूकदारासाठी एक प्रकारे चावडी आहे. याठिकाणी दरवर्षी आम्ही महाराष्ट्राकडे काय आहे, कोणती क्षमता आहे, हे शोकेस करण्यासाठी येत असतो. यंदाही गतवर्षीच्या तुलनेत आणखी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येईल असा विश्वास आहे. कारण देशात अशा प्रकारे येणारी गुंतवणूक व त्याबाबतचे करार करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अशाप्रकारे सुमारे ६० ते ६५ करार प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्राला यश मिळाले आहे.

## नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने अर्थसहाय्य करावे : महाराष्ट्राची मागणी

(पान १ वरून..)

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, कोकण गोदावरी खोरे, नळगंगा- वैनगंगा, पार गोदावरी या प्रकल्पांच्या कामासाठी अधिकच्या निधीची गरज असून, केंद्र सरकारने यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीष महाजन यांनी बैठकीदरम्यान केली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे २ प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन यामध्ये पाणीसाठाही होत आहे. डाव्या व उजव्या कालव्यांची कामेही पूर्ण होत आहेत. प्रकल्पाच्या कालव्यांचे अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून, पाण्याची वितरण व्यवस्था बंदिस्त करण्याचे धोरण घेण्यात आले असून, यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून निधी उपलब्ध व्हावा अशीही मागणी या बैठकीत करण्यात आली. यासाठी २ हजार ३८ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, निधी उपलब्ध झाल्यास बंदिस्त नलिका वितरण प्रणालीव्दारे ६४ हजार २६० हेक्टर क्षेत्राचे काम जलदगतीने पूर्ण होईल असा विश्वासही या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## विदेशी गुंतवणूकीसाठी 'महाराष्ट्र' भारताचा गेट वे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) यांनी सांगितले. आजच्या काळात स्टार्टअप्स अवघ्या ३-४ वर्षांत युनिकॉर्न होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा, फ्रंटियर टेक्नॉलॉजीज या क्षेत्रांमध्ये भारत, विशेषतः महाराष्ट्र आघाडी घेऊ शकतो. त्याचबरोबर, महाराष्ट्रात देशातील ६० टक्के डेटा सेंटर क्षमता असून, महाराष्ट्र आता भारताची 'डेटा सेंटर कॅपिटल' बनले आहे. हरित ऊर्जेवर आधारित, उच्च दर्जाची वीजपुरवठा व्यवस्था उभारून ही क्षमता आणखी वाढवली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवी मुंबई विमानतळाजवळ एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी, मेडिसिटी आणि जीसीसी सिटी उभारली जात असून, या एकत्रित प्रकल्पातून सुमारे ३५ लाख उच्च वेतनाच्या नोकऱ्या निर्माण होतील, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या संपूर्ण क्लस्टरमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडणार आहे.

वाढवण हे जगातील टॉप १० बंदरांपैकी एक असून 'जेएनपीटी'पेक्षा तीनपट मोठे असलेले हे बंदर जगातील सर्वात मोठ्या जहाजांना सामावून घेण्यास सक्षम असेल. पुढील तीन वर्षांत पहिला टप्पा कार्यान्वित होईल, आणि पुढील १०० वर्षांसाठी भारताच्या सागरी व पुरवठा साखळीला बळ देईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

उद्योगविकासासाठी कायदा व सुव्यवस्था अत्यंत महत्त्वाची असून, महाराष्ट्रात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबवले जात आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरक्षित आहे, विश्वासार्ह आहे आणि भविष्यासाठी सर्वोत्तम असल्याचेही त्यांनी सांगितले.

१९८० ते २००० या काळात शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आणि तो आजतागायत कायम आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शहरीकरणाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. देशाच्या सुमारे ६५ टक्के 'जीडीपी'चे निर्माण शहरांच्या आसपास होते, हे वास्तव ओळखून प्रधानमंत्री मोदी यांनी प्रथमच शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सुरू केली. स्मार्ट सिटी योजना, अमृत सिटी, स्वच्छ भारत अभियान, शहरांतील पायाभूत सुविधा, सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक आणि संस्थात्मक उभारणी यांसारख्या उपक्रमांमुळे आज भारतीय शहरे झपाट्याने बदलत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील २९ महापालिकांमध्ये राज्याच्या सुमारे ४० ते ४५ टक्के लोकसंख्या राहते. या शहरांचे जीवनमान उंचावले, त्यांना अधिक राहण्यायोग्य बनवले, तर केवळ नागरिकांचे जीवनच बदलणार नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# श्री गुरु तेग बहादुर साहिब जी- 'हिंद दी चादर'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



श्री गुरु तेग बहादुर (एप्रिल १६२१ नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरु होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरु तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे. श्री गुरु तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरु मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहोचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिबजी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

०१ एप्रिल १६२१ रोजी, अमृतसर येथे श्री गुरू गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरु हरगोबिंद आणि माता नानकी देवी यांच्या कुटुंबात झाला. १६६४ मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरु पदवी प्राप्त झाली होती. गुरु तेग बहादूर यांचे मूळ नाव 'त्यागमल' होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्यावेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना 'तेग बहादूर' म्हणजेच 'तलवारीसारखा धैर्यवान' हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत, ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले. मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरू तेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२ मध्ये त्यांची ४०० वी जयंती देशभर साजरी केली होती. त्यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दुःख में दुःख नहीं मानें,
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै,
कांचन माटी मानै,
लोभ मोह अभिमान न ता कै, हरख सोग नहीं जा कै
जो नर दुःख में दुःख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दुःखात असला तरी दुःखी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचे जीवन निर्भयता, धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेसाठी केलेल्या त्यागाचे प्रतीक आहे.

हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या साहिबजीच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत झाल्यानिमित्त महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादुर साहिबजी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यात विविध ठिकाणी भव्यदिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत.

नुकतेच ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक व सामाजिक संघटनांसह श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना आदरांजली अर्पण करण्यात येऊन सामाजिक, प्रबोधनात्मक व जागृतीपर कार्यक्रम संपन्न झालेत. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण झाले.

नांदेड येथे मुख्य कार्यक्रम

'हिंदी दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील मोदी मैदानावर आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. केंद्रीय गृहमंत्री श्री. शहा २५ जानेवारीला या कार्यक्रमाकरिता उपस्थित राहून श्री गुरु तेग बहादुर यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करतील. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सिख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी या सहा समाजातील देशभरातील सर्व संत, महंत, सामाजिक कार्यकर्ते, गणमान्य व्यक्ती, समाजबांधव एकत्र येऊन श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या पावन स्मृतींना नमन करुन त्यांचा धर्मरक्षण, सहिष्णुता आणि एकात्मतेचा-मानवतेचा संदेश सर्वदूर पोहोचविणार आहे. या शहिदी समागम कार्यक्रमातून हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कर्तृत्व आणि विचारांचा परिचय जनतेला होणार आहे.

**– विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# रक्ताच्या सावलीतला कौल : सोलापूरच्या निकालाने लोकशाहीला पडलेला काळा डाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूरच्या मातीत उमटलेले अलीकडचे निवडणूक निकाल हे केवळ एका उमेदवाराच्या किंवा एका पक्षाच्या विजयाची नोंद नाहीत. हे निकाल म्हणजे लोकशाहीच्या काळजाला पडलेले, सहज न सुटणारे एक भयावह कोडे आहे. आकड्यांच्या माळेत गुंफून ज्याचा जल्लोष केला जात आहे, त्या प्रत्येक मतामागे एक अस्वस्थ करणारे वास्तव दडलेले आहे. ज्या प्रभागात काही दिवसांपूर्वीच एका उमद्या कार्यकर्त्याच्या रक्ताने रस्ते ओले झाले, जिथे शोक, संताप आणि भीती यांचे गडद सावट आजही पसरलेले आहे, तिथे उमटलेला हा कौल लोकशाहीसाठी धोक्याची घंटा ठरतो.

ज्या घरातला दिवा अचानक विझला आहे, त्या कुटुंबाचे अश्रू अजून सुकलेले नाहीत. समाजमन अजून त्या धक्क्यातून सावरलेले नाही. अशा परिस्थितीत गंभीर गुन्हेगारी आरोपांच्या कचाट्यात सापडलेला, कायद्याच्या चौकटीत अडकलेला आणि तुरुंगाच्या भिंतीआड असलेला उमेदवार हजारो मतांनी विजयी होतो, तेव्हा हा केवळ राजकीय घटनाक्रम राहत नाही. तो मतदारांच्या विवेकावर, समाजाच्या नैतिकतेवर आणि राज्यव्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर थेट प्रश्नचिन्ह उभे करतो.

साधारणतः निवडणूक म्हणजे प्रचाराचा धुरळा, गाड्यांचे ताफे, घोषणांचा गजर आणि उमेदवार-मतदार यांच्यातील थेट संवाद असा लोकशाहीचा उत्सव मानला जातो. मात्र, सोलापूरमध्ये घडलेले चित्र या सर्व चौकटी मोडून टाकणारे आहे. प्रचाराची एकही गाडी न फिरता, मतदारांच्या दाराशी न जाता, कोणताही जाहीर संवाद न साधता केवळ 'नावाच्या वलयावर' किंवा 'भीतीवजा आदरापोटी' जेव्हा मतपेटीतून मतांचा पाऊस पडतो, तेव्हा लोकशाही ही विचारांची प्रक्रिया राहते की केवळ पाशवी संख्याबळाचे प्रदर्शन ठरते, हा मूलभूत प्रश्न ऐरणीवर येतो.



हा निकाल लोकशाहीतील संवादाचा पराभव आहे. हा विवेकाचा नव्हे, तर बाहुबलाचा विजय आहे. जेव्हा मतदार आपला निर्णय विचार, कार्यक्रम, कामगिरी किंवा भविष्याच्या आशेवर नव्हे, तर भीती, दबाव किंवा 'शक्ती'च्या आकर्षणावर घेतो, तेव्हा लोकशाहीची आत्मा हळूहळू गुदमरू लागते. आज जर तुरुंगातूनच सत्तेची सूत्रे हलणार असतील, तर संविधानाने दिलेल्या मतदानाच्या पवित्र अधिकाराचे मूल्य काय उरते, हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही.

यामागे एक अधिक भयावह वास्तव दडलेले आहे. जेव्हा सामान्य नागरिक व्यवस्थेकडून न्यायाची अपेक्षा सोडून देतो, जेव्हा पोलीस, न्यायालये आणि प्रशासन यांच्यावरील विश्वास ढासळतो, तेव्हा तो 'न्याय' नव्हे तर 'शक्ती' शोधू लागतो. अशा वेळी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले नेतृत्व त्याला सुरक्षित वाटू लागते, ही लोकशाहीची सर्वात मोठी शोकांतिका आहे. हा नैतिक अधःपतनाचा प्रश्न आहे की व्यवस्थेवरील टोकाच्या अनास्थेचा परिणाम, याचे आत्मपरीक्षण समाजाला करावे लागेल.

सोलापूरचा हा निकाल केवळ एका निवडणुकीपुरता मर्यादित नाही. तो भविष्यातील राजकारणाची दिशा सूचित करणारा इशारा आहे. जर आज या बाहुबलाच्या उघड्या प्रदर्शनाला यश मिळत असेल, तर उद्या राजकीय शुचितेच्या चिंध्या उडायला वेळ लागणार नाही. लोकशाहीचा गाभा असलेला विचार, चर्चा आणि मतभिन्नता या मूल्यांना हा कल गिळंकृत करू शकतो.

हा 'विजयोत्सव' साजरा करताना समाजाने आणि राजकीय व्यवस्थेने थांबून विचार करण्याची वेळ आली आहे. आपण कुठल्या लोकशाहीकडे चाललो आहोत? कायद्याच्या अधीन असलेली लोकशाही की कायद्यावर मात करणाऱ्या शक्तींची? सोलापूरच्या या निकालाने राजकीय नीतिमत्तेचा जो कराल अध्याय लिहिला आहे, तो वाचताना प्रत्येक सुजाण नागरिक अस्वस्थ झाल्याशिवाय राहणार नाही.

हा कौल केवळ जिंकण्याचा नाही, तो एक इशारा आहे. प्रश्न एवढाच आहे – आपण तो ऐकणार आहोत की रक्ताच्या सावलीतच पुढची लोकशाही घडवणार आहोत?

**– संजय घोलप**

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज; १० लाख भाविकांची मांदियाळी – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर (विमाका) : नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० वा 'शहीदी समागम' हा भव्य कार्यक्रम येत्या २४ आणि २५ तारखेला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

सूक्ष्म नियोजन आणि विविध समित्या

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड 'लंगर' (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहत आहे. हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा,सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

जनतेचे योगदान महत्त्वाचे

आजच्या धावपळीच्या जगात 'त्याग आणि सेवा' हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

## शिंदेसेनेचा 'तो' हट्ट भाजप पूर्ण करणार!; एका दगडात दोन पक्षी मारण्याची तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिंदेसेनेला स्पष्ट बहुमत मिळालं. मुंबईत महायुतीला ११८ जागा मिळाल्या. भाजपनं ८९, तर शिंदेसेनेनं २९ जागा जिंकल्या. शिंदेसेनेशिवाय भाजप सत्तेचा सोपान गाठू शकत नाही, याची जाणीव असल्यानं शिंदेसेनेनं थेट महापौरपदाची मागणी केली आहे. सुरुवातीला शिंदेसेनेनं अडीच वर्षांसाठी महापौरपद मागितलं. पण ही मागणी पूर्ण होऊ शकणार नाही, याची कल्पना येताच शिंदसेनेनं एक पाऊल मागे घेतलं आणि एक वर्षासाठी महापौरपद मिळावं, अशी मागणी केली. ही मागणी पूर्ण करुन भाजप एका दगडात दोन पक्षी मारु शकतो. शिंदेसेनेच्या पाठिंब्याशिवाय मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता येऊ शकत नाही. आकड्यांचा खेळ लक्षात घेऊन शिंदेसेनेनं महापौरपदाची मागणी केली आहे. शिंदेसेनेला वर्षभरासाठी महापौरपद दिलं जाऊ शकतं.



यामागे दोन महत्त्वाची कारणं आहेत. शिंदेसेनेला महापौरपद सोडून भाजप ठाकरे बंधूंना अप्रत्यक्षपणे धक्का देऊ शकतं. शिंदेसेनेला महापौरपद सोडण्याचे दोन फायदे भाजपला होऊ शकतात. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला २३ जानेवारीपासून सुरुवात होईल. बाळासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात मुंबईत त्यांच्या पक्षाचा महापौर असावा, असं भावनिक कार्ड शिंदेसेनेनं काढलं आहे. त्यामुळे भाजप वर्षभरासाठी शिंदेसेनेसाठी महापौरपद सोडू शकतो. बाळासाहेबांच्या स्मृतींना वंदन म्हणून त्यांच्या पक्षाला महापौरपद देत आहोत, अशी घोषणा भाजपकडून केली जाऊ शकते. बाळासाहेबांची शिवसेना आमच्या सोबत असल्याचा दावा भाजपकडून वारंवार केला जातो. त्यामुळे शिंदेसेनेला महापौरपद सोडून बाळासाहेबांना श्रद्धांजली अर्पित करत असल्याचा संदेश भाजपकडून दिला जाऊ शकतो.

महापौरपद वर्षभरासाठी शिवसेनेला देऊन भाजपकडून ठाकरे बंधूंचं नरेटिव्ह खोडण्याचा प्रयत्न होऊ शकतो. भाजप मराठी माणसांच्या विरोधात आहे. भाजप अमराठी समुदायाची बाजू घेणारा पक्ष आहे, असा प्रचार, प्रसार ठाकरे बंधूंनी निवडणूक काळात केला आहे. आता शिंदेसेनेसाठी महापौरपद सोडून हा प्रचार खोडून काढण्याची संधी भाजपकडून साधली जाऊ शकते. याचा फायदा भाजपला दिर्घकाळ होण्याची शक्यता आहे. बाळासाहेबांच्या पक्षासाठी महापौरपद सोडलं, असं नरेटिव्ह उभं करुन ठाकरे बंधूंची गोची केली जाऊ शकते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# प्रजासत्ताक दिन समारंभ नियोजन पुर्व बैठक संपन्न

## तहसिलदार सचिन लंगुटे यांनी घेतला नियोजनाचा आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ व्या वर्धापन दिन सोमवार दि.२६ जानेवारी २०२६ रोजी साजरा करण्यात येणार असून, शासकीय ध्वजारोहण समारंभाचा कार्यक्रम रेल्वे मैदान, पंढरपूर येथे घेण्यात येणार आहे. यासाठी दरवर्षी प्रमाणे प्रत्येक विभागाला दिलेली जबाबदारी संबधित विभागांनी यशस्वीपणे पार पाडावी अशा सूचना, तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिल्या.

प्रजासत्ताक दिनाच्या पुर्व तयारीबाबत तहसील कार्यालय पंढरपूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीस मुख्याधिकारी महेश रोकडे, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, संबधित विभागाचे अधिकारी तसेच पंढरपूर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

यावेळी तहसिलदार श्री लंगुटे म्हणाले, प्रत्येक विभागाकडे कार्यक्रमासंबंधीची जबाबदारी दिलेली असते त्या अनुषंगाने ती यशस्वीपणे पार पाडावी. सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरपालिका प्रशास-नाने मैदान स्वच्छ करुन, दगड व खडी काढून, पाणी टाकून रोलींग करावे.तसेच शुध्द पिण्याच्या पाण्याची व अग्निशमन व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकासह सुसज्ज रुग्णवाहिका व प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध ठेवावी. उपस्थित मान्यवरांची बैठक व्यवस्था, विद्युत व्यवस्था आदीबाबतची व्यवस्था संबधित विभागाने करावी अशा सूचनाही तहसिलदार श्री लंगुटे यांनी यावेळी दिल्या.

# ग्राहक उपभोक्ता संरक्षण समिती सिंदखेडराजा तालुका कार्याध्यक्षपदी विठ्ठल राठोड यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : केंद्र सरकार नोंदणीकृत असलेल्या माणूसकी सोशल फाँउडेशन संचलित ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या सिंदखेडराजा तालूका कार्याध्यक्ष पदावर सिंदखेडराजा तालुक्यातील जनुना तांडा येथील कवी लेखक पत्रकार विठ्ठल हिरामण राठोड यांची निवड करण्यात आली आहे.

या समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांनी विश्वास दाखवून विठ्ठल हिरामण राठोड यांची सिंदखेडराजा तालुका कार्याध्यक्ष पदी निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.या निवडीबद्दल विर्दभ प्रदेश अध्यक्ष पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते सचिन खंडारे यांच्या शिफारशीनुसार विठ्ठल राठोड यांची तालुका कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली. विठ्ठल राठोड यांची निवड झाल्याबद्दल कवि लेखक पत्रकार सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून जिल्हा भर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

# ईटकूर येथील पार्थ गुरुकुल पब्लिक स्कूलमध्ये बाल आनंद मेळावा उत्सवात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे,कळंब तालुक्यातील ईटकूर येथील पार्थ गुरुकुल पब्लिक स्कूल मध्ये शनिवारी बाल आनंद मेळावा आणि म कर संक्रांती निमित्त मदर्स मीटिंग त्याच बरोबर हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या एकत्रीत कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खाद्य पदार्थ स्टॉल लावले होते यात पॉपकॉर्न ,दही धपाटे,सोनपापडि, गुलाब जाम ,चक्कू, बोर, चिक्की, या सह विविध प्रकारचे पदार्थ फळे या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आपल्या स्टॉल वर ठेवले होते.यावेळी



पालकांनी व विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या खाद्य पदार्थांचा मनसोक्त आनंद घेतला.या मेळाव्याला पालकांनी मोठी गर्दि केली होती. विद्यार्थ्यांना शिक्षना बरोबरच व्यवहाराचे ज्ञान यावे यासाठी हा मेळावा घेण्यात आला होता असे संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय कोल्हे यांनी सांगितले..

# प्रचिती देशमुख यांनी पंचायत समिती पटवर्धन कुरवली गणामधून केला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मी एक उच्च शिक्षित महिला उमेदवार आहे. आपल्या मतदान गटातील मी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मी आपल्या मतदान गणात लढवण्याचा माझा मानस आहे. तसेच गोरगरीब विद्यार्थी व जनतेची सेवा करण्याचा विचार आहे. आम्हास कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नाही व सर्वसामान्य व्यक्तिमत्व म्हणून मी उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे आता ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध




जनशक्ती म्हणून माझ्यासमोर आहे.

माझे पती राहुल नामदेव देशमुख हे गेले दहा ते बारा वर्षे झाली लोकांच्या सेवेत आहेत ऑनलाइन चेक कसलेही काम असू दे आतापर्यंत कोणती फी न घेता लोकांचे फॉर्म भरून दिले आहे संगणक शिक्षण देऊन शेळवे पटवर्धन कुरवली कुरोली देवडे वाडे कुरोली पिलाचे कुरोली या गावांची विद्या-र्थी घडवले आहेत व त्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना त्यांच्या यशापर्यंत पोहोचवण्यात आम्ही प्रयत्न केल्या होत

तेच विद्यार्थी आज ग्रामीण भागातील युवा पिढी सक्षम झाली पाहिजे व त्यांना लवकर रोजगार मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न केले आहेत व यापुढेही देखील प्रयत्न तसेच काही मुलांना इंजिनीयर, वकील डॉक्टर करण्यात आम्ही कष्ट घेतले आहेत इथून पुढच्याही काळात आम्ही विद्यार्थी घडवून त्यांना सक्षम कसे करता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.

जर आपण मला संधी दिली तर त्याचे सोने करून दाखवू यासाठी सुज्ञ मतदार राजांना आम्हाला आशीर्वाद रुपी मतदान करावी असे आव्हान प्रचिती राहुल देशमुख यांनी केले आहे.

# लोक जनशक्ती पार्टी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वबळावर लढवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ लोक जनशक्ती पार्टी स्वबळावर लढवणार असल्याचे लोक जनशक्ती पार्टीचे धाराशिव जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात म्हटले आहे. लोक जनशक्ती पार्टी ही धाराशिव जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय कार्यामध्ये अग्रेसर असल्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक (२०२६ ) स्वबळावर लढवण्याची कार्यकर्त्यांची मागणी होत आहे.

त्यामुळे धाराशिव जिल्ह्या-तील सर्व जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातून ही सार्वत्रिक निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा धाराशिव जिल्हाध्यक्ष श्री राजाभाऊ गायकवाड यांनी केली आहे. यावेळी लोक जनशक्ती पार्टी पक्षाचे तालुका अध्यक्ष भारत कदम, शहर अध्यक्ष नागेश धीरे, मुकेश गायकवाड, प्रा. सतीश चंदनशिवे (उमरगा), तालुका अध्यक्ष मिथुन कांबळे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब टोपे यांच्या या प्रसिद्ध पत्रकावर स्वाक्षरी आहेत.

# श्री माणकेश्वर वाचनालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील श्री माणकेश्वर वाचनालय आयोजित न्यायमूर्ती महादेव गो-विंद रानडे व स्व. सुरेखा दत्तात्रेय गवते स्मृती प्रित्यर्थ जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे उद्घाटन कुंदेवाडी ग्रामपालिकेचे उपसरपंच वैकुंठ पाटील, निफाड ग्राम पालिकेचे माजी सदस्य महेश चोरडिया यांचे शुभ हस्ते करण्यात आले. न्यायमूर्ती रानडे स्मारक व छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर बाबुराव शेलार, उपाध्यक्ष डॉ.. मेघा जंगम, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहुल गवते, हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, संचालक



सुहास सुरळीकर, डॉ. महेश बनकर, राजेंद्र खालकर, सु-नील चिखले,. सुरेखा आहेर, सभासद प्रवीण तनपुरे आदी उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी श्री वैकुंठ पाटील यांनी आपल्या मनोगतात वाचनालयाचे कामाचा गौरव करून.समाधान व्यक्त केले,

यावेळी पारितोषिक वितरण प्रसंगी इयत्ता ५वी ते ७वी गटात प्रथम स्वरा संदीप भाबड,द्वितीय आराध्या स्वप्नील कुंदे, तृतीय कार्तिकी विनोद बनकर, उत्तेजनार्थ सृष्टी राहुल जगताप इयत्ता ८वी ते १०वी गटात प्रथम स्वरा संदीप मगर, द्वितीय अनुजा दुर्गेश देवरे, तृतीय अन्विता सचिन जाधव आदी यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे साहित्यिक महाराष्ट्र शास-नाचा कृषिरत्न पुरस्कार विजे-ते सचिन होळकर, सामाजिक कार्यकर्ते गणेश कापसे, वैनतेय विद्यालय चे पर्यवेक्षक . गुलाब टकले आदींच्या हस्ते रोख पारितोषिक,व सन्मान चिन्ह , प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले

याप्रसंगी दीपक श्रीव-ास्तव याचे तर्फे स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना पर प्रत्येकी रू.५१ पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे . सचिन होळकर यांनी मनोगत व्यक्त करताना वाचनालय २१ वर्षापासून वक्तृत्व स्पर्धा आयोजित करीत आहे यामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ निर्माण केले असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन चांगले वक्ते घडवण्याचे काम या वाचनालयाकडून केले जाते मी वाचनालयास धन्यवाद देतो असेच उपक्रम वाचनालयाने राबवावे असे प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती गुलाब टकले स्पर्धेचे परीक्षक मंदाकिनी बालाजी भागवत प्रा.आर.डी. शिंदे, श्रीमती. भुसारे आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे अध्यक्ष . मधुकर बाबुराव शेलार व उपाध्यक्षा. डॉ. मेघा जंगम, यांनी उपस्थितांचे आभार मानून मानले सूत्रसंचालन संचालक सुहास सुरळीकर यांनी केले.

यावेळी वाचनालयाचे, चिटणीस प्रा. बाळासाहेब कापसे सहचिटणीस . राहुल दवते,, संचालक डॉ. महेश बनकर, राजेंद्र खालकर, सुनील चिखले, सुरेखा आहेर,. रशीद पठाण , शिक्षक वृंद पालक यांसह वाचनालयाचे ग्रंथपाल नितीन बनसोडे सहा. ग्रंथपाल .आरती जंगम, कर्मचारी नंदकुमार पुंड .अनिता इस्ते आदी उपस्थित होते.

**विविध कलाविष्काराने उपस्थितांची मिळवली शाबासकी**

# निफाडला न्या. रानडे यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : न्या. रानडे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ या संस्थेच्या विविध शाखांचा सांस्कृतिक कार्यक्रम तीन दिवस संपन्न झाला विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध कलाविष्कार सादर करीत उपस्थितांची शाबासकी मिळवली

न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय विद्यालय, वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल, वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर ,वैनतेय शिशुविहार या सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध गुणदर्शन दाखवले.

या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, संस्थेचे विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड दिलीप वाघावकर,




राजेश सोनी, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे, प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर पर्यवेक्षक बी.बी. गुंजाळ, श्रीमती आर एम लाहोटी, वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या पल्लवी सानप, वैनतेय प्राथमिक विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, वैनतेय शिशुविहारच्या पाठक आदी मान्यवर उपस्थित होते वैनतेय शिशविहार व वैनतेय प्राथमिक विद्या मंदिर , वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल तसेच वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.

या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लख्ख पडला प्रकाश, खंडोबाची कारभारीन, कशी मी जाऊ मथुरेच्या बाज-ारी, बानुच्या घराला,मंगळागौर खेळू या, माऊली माऊली, काठी न घोंगड घेऊ द्या की र, नगाडा संग ढोल, या व इतर मराठी, हिंदी गीतावर आधारित समूह नृत्य सादर करतांना गोंधळी नृत्य, शेतकरी नृत्य, मंगळागौरी नृत्य, देशभक्तीपर नृत्य, राजस्थ-ानी नृत्य ,भक्तीप्रधान नृत्य, वीर नृत्य, वारकरी नृत्य, गरबा नृत्य, सादर केले वाचन चळवळीवर आधारित वाचाल तर वाचाल या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले नाटिका व एकपात्री प्रयोग सादर करण्यात आला समूह गीत सादर करण्यात आले.

राष्ट्रभक्तीपर गीतावर आधारित समूह नृत्य सादर करण्यात आले.




# डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/प्रतिनिधी : शनिवार दि. १७ जानेवारी रोजी डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोलामध्ये बी.एस्सी(ई.सी.एस) विभागाच्या वतीने 'इनोव्हेटिव्ह टूल्स फोर एनहॅनसिंग रिसर्च पेपर रायटिंग एफिशियन्सी' या विषयावरती एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र मोठ्या उत्स-ाहात संपन्न झाले. या चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी युनिव्हर्सिटी पुणे येथील प्रा.डॉ.गोपाळ साकरकर यांच्या हस्ते करण्यात आले. चर्चासत्राच्या उद्घाटनास प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी युनिव्हर्सिटी पुणे येथील डॉ. विकास मगर, महाविद्यालयाचे आय.क्यू.ए.सी कॉर्डिनेटर डॉ.शंकर धसाडे, संगणकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा.कोळवले एच.डी, चर्चासत्र समितीचे समन्वयक प्रा.भानवसे डी.पी.हे उपस्थित होते.

उद्घाटन समारंभाचा कार्यक्रम संपल्यानंतर टेक्निकल सेशन भाग एक यामध्ये प्रा.डॉ.गोपाळ साकरकर सरांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी रिसर्च पेपर कशा पद्धतीने लिहिला जातो, त्या रिसर्च पेपरमध्ये कोणत्या गोष्टी नमूद केलेल्या असाव्यात? व कोणत्या गोष्टी नसाव्यात ? याची माहिती सविस्तरपणे दिली. टेक्निकल सेशन भाग दोन यामध्ये डॉ. विकास मगर यांनी अनमोल असे मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी असे सांगितले कि रिसर्च पेपर लिहीत असताना नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग कशा पद्धतीने करावयाचा व कोणत्या पद्धती आत्मसात कराव्यात याची सखोल माहिती सांगितली. या चर्चासत्रासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिकेत(भैय्या) देशमुख, संस्थेचे सचिव मा.विठ्ठलराव शिंदे सर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी व संस्थेचे सर्व सदस्य यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी संगणकशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.शेख एन.एस. व प्रा.सौ. सुर्यवंशी ए.पी. यांनी केले आहे. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शिंदे डी.आर. यांनी केले आहे.

# समतादुतांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे वाहक व्हावे

## डॉ हर्षदीप कांबळे; महाडमध्ये समतादुतांची दोनदिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाड/प्रतिनिधी : बार्टीचे समतादूत हे संपूर्ण राज्यात शासनाच्या तसेच सामाजिक न्याय विभाग व बार्टीच्या विविध योजनाचा प्रसार व प्रचार करण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात. शासनाच्या योजनांचा लाभ वंचित घटकापर्यंत पोहोचण्यासाठी समतादुतांना समतादूत पचा मोठा फायदा होईल.समतादूत हे शासनाचे मजबूत पाईक आहेत, त्यांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे वाहक व्हावे, असे आवाहान सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने दिनांक १९व २० जानेवारी २०२६ रोजी समतादूत व प्रकल्प अधिकारी यांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा क्रांतीभूमी महाड , जिल्हा रायगड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथे आयोजित करण्यात आली या कार्यशाळेचे दुरुस्तथ प्रणालीद्वारे उद्घाटन डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण, सहाय्यक लेखाधिकारी उल्हास शिंदे, आदी उपस्थित होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास मा. महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना डॉ. कांबळे म्हणाले, सामाजिक न्याय विभाग शासनाच्या १७ विभागांना योजनांसाठी निधी देत असतो. या सर्व योजनांचा प्रचार-प्रसार समदुतांनी करावा. शासनाच्या विकास योजनेच्या प्रक्रियेत समतादुतांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या प्रक्रियेत हिरीरीने सहभाग घेऊन आपल्या कामाचा ठसा उंचवावा असे,आवाहानही त्यांनी केले.

कार्यशाळेला संबोधित करताना महासंचालक सुनील वारे म्हणाले की, महाड ही क्रांतिकारी भूमी असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी याच क्रांतीभूमीत चवदार तळ्याचा सत्याग्रह करून समता प्रस्थापित केली. तो लढा आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

समतादूत हे गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या व सामाजिक न्याय विभागाच्या तसेच बार्टीच्या विविध योजनांचा प्रसार आणि प्रचार करतात. समतादूतांना अवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देऊ. समतादुतांनी बदलत्या काळानुसार आपल्यात बदल केला पाहिजे. नवे ज्ञान, नवे कौशल्य विकसित केले पाहिजे असेही ते म्हणाले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना विस्तार व सेवा विभागाचे विभाग प्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी सर्व राज्यातील प्रत्येक तालुक्यात आपले समतादूत चांगले काम करत असून समतादूतांच्या कामात गतिशीलता येण्यासाठी महाड येथे दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले तसेच उल्लेखनीय काम करणाऱ्या समतादूत आणि प्रकल्प अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करणार असल्याचे सांगितले. समतादूत प्रकल्पाचे गतीने काम करण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा समतादुतांनी वापर करवा, असे आवाहनही त्यानी केले.

कार्यालयीन कामात शिस्त याविषयी निबंधक विशाल लोंढे यांनी सर्व समतादुतांना मौलिक मार्गदर्शन करून संवाद साधला.

या कार्यशाळेला संपूर्ण राज्यातून ३०० समतादूत व प्रकल्प अधिकारी उपस्थित आहेत.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी समतादूत विभागाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्वी सोनवणे, राजश्री कांबळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाडचे व्यवस्थापक प्रकाश जमदाडे, माहिती जनसंपर्क अधिकारी लिना कांबळे, यांनी मेहनत घेतली.सूत्रसंचालन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

---

### श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा

# श्री रूक्मिणी स्वयंवर कथेस प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचा विवाह सोहळा माघ शुध्द १ ते ५ या कालावधीत संपन्न होत असून, मुख्य दिवस वसंत पंचमी म्हणजे दिनांक २३ जानेवारी रोजी आहे. त्या निमित्ताने श्री विठ्ठल सभामंडप येथे दुपारी ०४.०० ते सायं ०६.०० या वेळेत श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) राजेंद्र शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली.

**भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा दिदी शेटे यांचे सुमधूर व रसाळ वाणीने कथेचे निरूपण; रूक्मिणी मातेस अलंकार परिधान,**




श्री रूक्मिणी स्वयंवर कथा दि. १९ ते २३ जानेवारी दरम्यान दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी मंदिर समितीने केली असून, परंपरेनुसार वसंत पंचमी दिवशी स.१०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा संपन्न होत आहे. त्या दिवशी येणा-या भाविकांना अन्नछत्रात विशेष भोजनाची व्यवस्था, मंदिर समितीचे संकेतस्थळ, फेसबुक, युट्यबवरून थेट प्रेक्षपण, मंदिर परिसरात एलईडी स्क्रिन, स्वच्छता , मंडप, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट, सुरक्षारक्षक नियुक्ती तसेच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विवाह सोहळा संपन्न झाल्यानंतर दुपारी प्रदक्षिणा मार्गावर शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचेही मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री भोसले यांनी सांगितले.

**श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या मळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले आहेत.**

---

# कुर्डूवाडी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने नगराध्यक्ष जयश्रीताई भिसे व महिला नगरसेवकांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

जिजाऊ ब्रिगेड माढा तालुका व कुर्डूवाडी शहर यांच्या वतीने स्वराज्य संकल्पिका राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीनिमित्त कुर्डूवाडीच्या नगराध्यक्ष जयश्रीताई भिसे व सर्व नवनियुक्त महिला नगरसेवकांचा सन्मान जिजाऊ मासाहेब यांच्या प्रतिमेच्या पूजनाने जिजाऊ चरित्र कुशाल फेटा बांधून करण्यात आल्या जिजाऊ माँ साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून काव्य निलेश यांनी जिजाऊ वंदना गायली प्रसिद्ध निवेदिका पल्लीवा माने यांचाही सन्मान करण्यात आला.



यात अनेक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत बक्षिसे मिळवली व स्नेहा गवळी, प्रतीक्षा गोपने सीमा रजपूत अंजली गावडे अश्विनी शिंगारे यांच्या वतीने बक्षीस देण्यात आली नवनियुक्त नगराध्यक्ष जयश्री भिसे नगरसेविका सविता जगताप भाग्यश्री पाटील स्नेहा गवळी आंबोली चौधरी अंजली गावडे रेश्मा गोरे रुशाली गांधी वनिता सातव शोभा गोरे पल्लवी कांबळे संस्था चाऊस सरस्वती शिरसागर प्रतीक्षा गोपने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका निकिता नागेश खटके वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुनंदा रणदिवे साक्षी डिगोळे यांच्या वेळी सन्मान करण्यात आला यावेळी नगराध्यक्ष जयश्रीताई भिसे यांनी शिवसेना महिला जिल्हाध्यक्ष अशा टोणपे, संभाजी ब्रिगेडच्या प्रवक्ता हर्षल बागल, हिंदी फिल्म मनोगत व्यक्त करून जिजाऊ आदर्श घेण्याची मनोगत व्यक्त केले. ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष गीता ताई खटके, कुर्डूवाडी शहराध्यक्ष मनीषा गाडे कार्याध्यक्ष अरुणा पाटील, शेर सचिव अश्विनीताई गवळी, शेर उपाध्यक्ष प्रफुल्लता मोहिते, यांनी प्रयत्न केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष गीता ताई खटके कुर्डूवाडी शहराध्यक्ष मनीषा गाडे कार्याध्यक्ष अरुण पाटील शहर सचिव अश्विनीताई गवळी शहर उपाध्यक्ष प्रफुल्लता मोहिते , शेअर सचिव अश्विनीताई गवळी , डॉक्टर मोहसीन मकानू संभाजी ब्रिगेडचे राज्य संघटन दिनेश जगदाळे मराठा सेवा संघाचे माढा तालुका अध्यक्ष दिनेश देशमुख संघटक कुलदीप खटके सचिव सुरज मोहिते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

---

# एलएलबी (लॉ) प्रवेशासाठी आवश्यक 'सीईटी २०२६' परीक्षेचे ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु; २३ जानेवारी २०२६ पर्यंत चालणार प्रक्रिया

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये एलएलबी (तीन वर्ष व पाच वर्ष कालावधी) ला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया तीन वर्ष कालावधीसाठी गुरुवार, ८ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, २३ जानेवारी २०२६ पर्यंत तसेच पाच वर्ष कालावधीसाठी शुक्रवार, ९ जानेवारी पासून ते शनिवार, २४ जानेवारीपर्यंत सुरु राहणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

एलएलबी (लॉ) प्रवेशासाठी अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'एमएएच-सीईटी




२०२६' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत (तीन वर्ष कालावधीसाठी) गुरुवार, दि.०८ जानेवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ पर्यंत तसेच पाच वर्ष कालावधीसाठी शुक्रवार, दि.०९ जानेवारी २०२६ पासून ते शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ पर्यंत आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरी लॉ कॉलेजमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फॉर्म फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सीईटी फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःचा अपार आयडी तयार करून घ्यावा लागेल, तसेच आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करिता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रा. उत्तम अनुसे (मोबा.-९१६८६५५३६५), तर एल.एल.बी. संदर्भात अॅड. विक्रम पाटील (मोबा.नंबर-९०९६०१६६२५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

---

# खुदावाडी पंचायत समिती गणातून किशोर धुमाळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नंदगाव जिल्हा परिषद गट अंतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणातून वागदरी तालुका तुळजापूर येथील किशोर पांडुरंग धुमाळ उर्फ कुशाबा यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

किशोर धुमाळ हे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांनी तुळजापूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार राणा दादा यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे कार्य निष्ठेने करतात.भारतीय जनना पक्षाने राबविलेल्या विविध उपक्रमामध्ये ते सक्रिय असतात त्यांनी पक्षाची सदस्य नोंदणी अभियानामध्ये अडीचशे हुन अधिक सदस्यांची नोंदणी केली आहे.वेळोवेळी होणाऱ्या पक्षाच्या बैठका,कार्यक्रम यामध्ये ते सक्रीय असतात. आपल्या परिसरातील गोरगरीब जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्या आमदार राणा दादा पाटील साहेब यांच्या पर्यंत पोहोचून त्या सोडवण्याचा प्रयत्न करतात. गावोगावी त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे.ते प्रत्यक्ष सामान्य जनतेपर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देतात.त्यामुळे जनमानसात त्यांची एक चांगली प्रतिमा आहे. भाजपा नंदगाव जि. प. गटप्रमुख तथा तुळजापूर मार्केट कमिटीचे सदस्य सिद्धू अण्णा कोरे,भिवाजी इंगोले, विवेकानंद मिलगीरी,महादेव सालगे,अंगद




जाधव आधी जेष्ठ कार्यकर्त्यांच्या समवेत पक्ष बांधणीचे काम प्रामाणिकपणे करतात त्यामुळे एकूणच त्यांच्या कार्याचा विचार करून पक्षश्रेष्ठीने किशोर धुमाळ यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी होत आहे. याबाबत किशोर धुमाळ यांना भ्रमन ध्वनीवरून विचारले असता ते म्हणाले की माझ्यासाठी पक्षश्रेष्ठीचा निर्णय हा अंतिम असून पक्षश्रेष्ठी जो निर्णय देईल तो मान्य करून भाजपा बरोबरच एकनिष्ठ राहणार असे ते म्हणाले.

---

**आरोग्य सेवांच्या गुणवत्तेची तपासणी**

**डिजिटल पोर्टल्सचा प्रत्यक्ष वापर व १३ मूलभूत सेवा उपकेंद्र स्तरावर तपासल्या**

# अरुणोदय सिकलसेल ऑनिमिया अभियानाचा पडघा आरोग्य केंद्रात आयुक्तांकडून आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी आयुक्त डॉ. कादंबरी बालकवडे यांनी डायरेक्टर हेल्थ सर्विसेस डॉ. नितीन अंबाडेकर यांच्यासह भिवंडी तालुक्यातील पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. या भेटीदरम्यान जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या कामकाजाची सखोल पाहणी करण्यात आली.






या प्रसंगी उपस्थितांमध्ये उपसंचालक डॉ. नांदापूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार आदी मान्यवरांचा समावेश होता.

दौऱ्याच्या सुरुवातीस आयुक्तांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची यंत्रणा आणि उपलब्ध सुविधा प्रत्यक्ष पाहून घेतल्या. यावेळी ए-डीहीीी, ए-ीहरवहळ व ए-तळप यांसारख्या डिजिटल पोर्टल्सचा प्रत्यक्ष वापर होत आहे की नाही, याची सविस्तर पडताळणी करण्यात आली.

प्रयोगशाळेत होत असलेल्या विविध चाचण्या, त्यांचे प्रमाण, नोंदी व रिपोर्टिंग प्रणाली तपासून आरोग्य सेवांची गुणवत्ता व कार्यक्षमता पाहण्यात आली.

यानंतर आयुक्त व डायरेक्टर हेल्थ सर्विसेस यांनी अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्र पडघा अंतर्गत उपकेंद्र स्तरावर सुरू असलेल्या अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाची अंमलबजावणी कशी केली जात आहे, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच उपकेंद्र पातळीवर दिल्या जाणाऱ्या १३ मूलभूत आरोग्य सेवांची गुणवत्ता, पोहोच व अंमलबजावणी तपासण्यात आली.

बैठकीदरम्यान नागरिकांना अधिक प्रभावी, वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक उपाय, साधनसुविधा, मार्गदर्शक तत्त्वे व आवश्यक बदल याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सेवा पुरविताना येणाऱ्या अडचणींबाबत कर्मचाऱ्यांकडून माहिती घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले.

या दौऱ्यात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नलिनी ठोंबरे, पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञेश पाटील, डॉ. निखील जोगळेकर, डॉ. साक्षी बुलबुले तसेच सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाच्या माध्यमातून सिकलसेल आजाराचे लवकर निदान, प्रतिबंधक उपाययोजना, प्रभावी उपचार व जनजागृती यावर भर देण्यात येत असून अशा प्रत्यक्ष भेटी व आढावा दौऱ्यांमुळे अभियान अधिक सक्षमपणे राबविण्यास बळ मिळत असल्याचे प्रशासनाने नमूद केले.